महाराष्ट्र पोलीस

पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर,वसई-विरार
सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mbvv@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/मिभावबि/आस्था-1/पो.भ.2024-25/ले.प.पा.यादी/ ९२ /2026 दिनांक :- 05/04/2026

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस शिपाई भरती सन 2024-25

**-: पोलीस शिपाई पदाचे लेखीपरीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी :-**

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयाच्या आस्थापनेवरिल सन 2024-25 करीता रिक्त असलेल्या 840 पोलीस शिपाई पदांचे उमेदवारांचे शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी दि. 20.02.2026 ते दि. 10.03.2026 तसेच दि. 23.03.2026 ते दि. 25.03.2026 रोजीपर्यत आयोजित करण्यात आलेली होती. सदर शारिरीक मोजमाप व मैदाणी चाचणी पुर्ण झाल्यानंतर, शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणीकरीता हजर असलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार शारिरीक मोजमापात पात्र ठरले आहेत अशा उमेदरवारांचे मैदाणी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांची चेस्ट क्रमांकानुसार तात्पुरती यादी या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात दि. 28.0.03.2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तद्नंतर, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार मैदानी चाचणीत किमान 50% त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांपैकी प्रवर्गनिहाय गुणत्तेनुसार पदांच्या 1:10 प्रमाणात लेखी परीक्षेकरीता पात्र उमेदवारांची यादी कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन दिनांक- 01/04/2026 रोजी या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर यादीबाबत उमेदवारांच्या प्राप्त हरकती/आक्षेपांचे निरसन करण्यात आलेले असुन, लेखी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवाराची यादी अंतिम करण्यात येत असुन, सदर यादी कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन तयार करण्यात आलेली आहे. सदर यादी यासोबत संलग्न करुन या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर तसेच मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर अंतिम यादी प्रसिद्ध केल्यानंतर उमेदवारांना कोणताही दावा/ हरकती/ तक्रार करता येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेचे ठिकाण, वेळापत्रक व इतर सूचना या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सर्व पात्र उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

05/04/26

**दिनांक- 05/04/2026**
**ठिकाणी :- मिरा-भाईंदर, वसई-विरार**

( दत्तात्रय शिंदे )
**अपर पोलीस आयुक्त,**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार**